शुक्रवार, २२ मार्च २०२४

# वृत्तविद्या

www.vruttaonline.wordpress.com
किंमत - १२ रू. | पाने- ०४ | पुणे आवृत्ती

## सोन्या चांदीचे भाव


₹6,135/ ग्रॅम


₹81.5/ग्रॅम




धोनीचा कर्णधारपदाला रामराम
पान ४

# डॉ. विजय भटकर यांना पुण्यभूषण पुरस्कार

पुणे: संगणक शास्त्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी डॉक्टर विजय पाटकर यांना यांना यंदाचा पुण्यभूषण पुरस्कार जाहिर झाला आहे. पुण्यभूषण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉक्टर सतीश देसाई यांनी ही घोषणा केली आहे. याचवेळी सीमेवर लढताना जखमी झालेल्या आणि त्यांच्या वीरमातांनाही सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार कला, विज्ञान, साहित्य, चित्रपट सृष्टी, संगीत, क्रीडा, सामाजिक व राजकीय अशा सर्व क्षेत्रातील दिग्गजांना दिला जातो. पुण्याचा गौरव वाढविणाऱ्या एका व्यक्तीला दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार प्रदान सोहळा जुले महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात किंवा ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात पार पडण्यात असल्याचे पुण्यभूषण संस्थेकडून जाहीर करण्यात आले आहे. डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या समितीने यंदाचे पुरस्काराची निवड केली आहे.



### कोण आहेत डॉ. भटकर?

77 वर्षीय डॉक्टर विजय भटकर यांचा जन्म अकोला जिल्ह्यातील मुरंबा येथे झाला आहे. त्यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण नागपूर येथून पूर्ण केले तर आयआयटी दिल्ली येथून त्यांनी एचडी ची पदवी प्राप्त केली आहे. 'महासंगणकाचे जनक' हे त्यांची ओळख आहे. 2017 सालापासून ते नालंदा विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून काम करत आहेत.

### यांना दिला जातो हा पुरस्कार...

पुण्याचा गौरव वाढविणाऱ्या एका व्यक्तीला दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. यंदा पुरस्काराचे ३६ वे वर्ष आहे. सलग ३५ वर्षे संस्थेने, संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर देशात आणि देशाच्या बाहेरही ह्या प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या पुरस्काराचा भव्य उपक्रम राबविला आहे.

बालशिवाजींची, सोन्याच्या फाळाने पुण्याची भूमी नांगरत असलेली प्रतिकृती, या नगरीच्या ग्रामदैवतांसह वैशिष्ट्यपूर्ण अशा या पुण्यभूषण पुरस्काराच्या स्मृतीचिन्हात आहे. पुरस्काराच्या रक्कमेत या वर्षी पासून वाढ करण्यात आली असून रू १,००,०००(रुपये एक लाख) वरून ती रु. २,००,००० (रुपये दोन लक्ष) करण्यात आली आहे.

## इस्रोची मोहीम 'पुष्पक' वाहनाची चाचणी यशस्वी

कर्नाटक - भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे RLV (पुन्हा वापरता येण्याजोगे प्रक्षेपण वाहन) - 'पुष्पक' - कर्नाटकातील चल्लाकेरे येथील एरोनॉटिकल चाचणी श्रेणीच्या धावपट्टीवर यशस्वीरित्या उतरले.पंख असलेले वाहन भारतीय वायुसेनेचे चिनूक हेलिकॉप्टर उचलून ४.५ किमी उंचीवरून सोडण्यात आले. यानंतर, पुष्पकने "क्रॉस-रेंज सुधारणांसह स्वायत्तपणे धावपट्टीवर संपर्क साधला", इस्रोने एका निवेदनात म्हटले आहे.पुष्पकचे यशस्वी लँडिंग RLV तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील अंतराळ संस्थेसाठी एक प्रमुख मैलाचा दगड ठरला. मालिकेतील दुसरा, RLV LEX-02 लँडिंग प्रयोग शुक्रवारी सकाळी 7:10 वाजता आयोजित करण्यात आला.भारतीय अंतराळ संस्थेने यापूर्वी २०१६ आणि एप्रिल २०२३ मध्ये या यशस्वी मोहिमा पार पाडल्या होत्या. X वरील त्याच्या पोस्टमध्ये, असे म्हटले आहे की, "इस्रोने ते पुन्हा केले! पुष्पक (RLV-TD), पंख असलेले वाहन, नाममात्र स्थितीतून सोडल्यानंतर धावपट्टीवर अचूकपणे स्वायत्तपणे उतरले."''या दुसऱ्या मोहिमेसह, इस्रोने नेव्हिगेशन, कंट्रोल सिस्टीम, लँडिंग गियर आणि स्पेस-रिटर्निंग व्हेईकलचे हाय-स्पीड ऑटोनॉमस लँडिंग करण्यासाठी आवश्यक असलेल्या डिलेरेशन सिस्टमच्या क्षेत्रातील स्वदेशी विकसित तंत्रज्ञानाचे पुन्हा प्रमाणीकरण केले आहे," असे स्पेस एजन्सीने त्यांच्या विधानात म्हटले आहे. यापूर्वी, इस्रोचे प्रमुख एस सोमनाथ म्हणाले होते, "पुष्पक प्रक्षेपण वाहन हे अंतराळात सर्वात स्वस्त प्रवेश करण्याचा भारताचा धाडसी प्रयत्न आहे. हे भारताचे भविष्यवादी RLV आहे, जिथे सर्वात महाग भाग, वरचा टप्पा, ज्यामध्ये सर्व महागड्या इलेक्ट्रॉनिक्स आहेत."

## रोहित पवार यांचे सरकारवर आरोप

पुणे (ता.२२): राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी आज पुणे येथे पत्रकार परिषदेमध्ये सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप केले. त्यांनी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना वितरित होणाऱ्या दुधासाठीचा घोटाळा व त्याचबरोबर सामाजिक न्याय विभागाच्या वसतीगृहाच्या घोटाळ्याचा आरोप राज्य सरकारवर केला आहे. यासंदर्भात सरकार चौकशी करणार का? ज्या कंपन्यांना हे कंत्राट दिले आहे त्या कंपनीचे सदस्य असणारे संबंध यावर सरकार उत्तर देणार का? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी चालवल्या जाणाऱ्या वसतीगृह साठीची निविदा पूर्वी स्थानिक पातळीवर दिली जायची. प्रति विद्यार्थी दरमहा चार हजार रुपये एवढ्या खर्चानुसार होती परंतु वर्तमान सरकारने ही निविदा गैरसनी कंपन्यांना देऊन प्रति विद्यार्थी पाच हजार दोनशे रुपये एवढ्या दराने देऊ केली तर ही 25 टक्क्यांनी केलेली वाढ कोणाच्या फायद्यासाठी करण्यात आली आहे असा प्रश्न त्यांनी सरकारला विचारला आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा भूतान दौऱ्यावर

पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी दोन दिवसांच्या भूतान दौऱ्यावर पोहोचले. हिमालयीन देशात नवीन सरकारने पदभार स्वीकारल्यानंतर पंतप्रधानांचा हा पहिलाच दौरा आहे. पारो आंतरराष्ट्रीय विमानतळावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आगमन झाल्यानंतर त्यांचे समकक्ष पंतप्रधान शेरिंग तोबगे यांनी त्यांचे स्वागत केले. नंतर, पंतप्रधान मोदी भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक आणि त्यांचे वडील जिग्मे सिंगे वांगचुक, हिमालयी राष्ट्राचे चौथे राजा यांच्यासोबत प्रेक्षकांना भेटतील.मोदी त्यांचे भूतानचे समकक्ष शेरिंग



तोबगे यांच्याशीही द्विपक्षीय चर्चा करतील. पंतप्रधान मोदी यांचे पारंपारिक बौद्ध मठ आणि भूतान सरकारचे आसन असलेल्या ताशीछो झोंग येथे भव्य स्वागत होणार आहे.

भूतानचे पंतप्रधान शेरिंग तोबगे हे गेल्या आठवड्यात पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर होते, जानेवारीमध्ये सर्वोच्च पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांचा पहिला परदेश दौरा होता. आपल्या भेटीदरम्यान त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली आणि पंतप्रधान मोदींची भेट घेतली. इतर महत्त्वाच्या कामांसोबतच त्यांनी विविध उद्योगांच्या प्रमुखांसोबतही बैठका घेतल्या.मोदींच्या दौऱ्याच्या अगोदर, परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने (एमइए) एका निवेदनात म्हटले आहे की, भारत आणि भूतानमध्ये "एक अनोखी आणि टिकाऊ भागीदारी आहे जी परस्पर विश्वास, समजूतदारपणा आणि सद्भावनेत रुजलेली आहे".''भारत आणि भूतानमधील नियमित उच्च-स्तरीय देवाणघेवाणीची परंपरा आणि 'नेबरहुड फर्स्ट पॉलिसी'वर सरकारचा भर याच्या अनुषंगाने ही भेट आहे," असे एमइए ने म्हटले आहे.''भारत आणि भूतान यांच्यात एक अनोखी आणि चिरस्थायी भागीदारी आहे जी परस्पर विश्वास, समजूतदारपणा आणि सद्भावनेत रुजलेली आहे. आमचा सामायिक आध्यात्मिक वारसा आणि लोकांमधले उबदार संबंध आमच्या अपवादात्मक संबंधांना खोल आणि चैतन्य देतात," असेही मंत्रालयाने म्हटले आहे.

*PTI source*

# अँकर १४० कोटींसाठी पाण्याचे काय करणार?

भारताची 140 कोटी पार गेलेली लोकसंख्या आणि शेतीसाठी असलेली पाण्याची मोठ्या प्रमाणात गरज लक्षात घेता पाणी समस्या ही भारतासाठी येत्या काळात मोठी समस्या असणार आहे. त्याचबरोबर संपूर्ण जगासाठी पाण्याच्या स्त्रोतांचे संवर्धन करण्या वाचून पर्याय राहिलेला नाही. आयुष्यातील प्रत्येक घडामोडी साठी पाण्याची गरज भासते भारतामध्ये प्रामुख्याने शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याची गरज निर्माण झाली आहे. विविध पाण्याचे स्त्रोत तलाव तळे नद्या प्रचंड प्रमाणात प्रदूषण झाल्यामुळे तसेच खालावलेली भूजल पातळी ही भारताच्या आर्थिक विकासात कार्बन उत्सर्जनाबरोबरच मोठी अडचण असणार आहे. या अडचणीवर मात करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर धोरणात्मक अंमलबजावणीची गरज आहे. त्यामुळे या समस्येची जगाला जाणीव करून देण्यासाठी पाण्याचा उपयोग थांबवण्यासाठी आणि जलप्रदूषणापासून सर्व स्त्रोतांना संरक्षण देण्यासाठी दरवर्षी वीस मार्च दिवस जागतिक जल दिन म्हणून साजरा केला जातो. परमेश्वर उद्याची कल्पना अशक्य असल्याने त्याच्या नियोजनबद्ध वापरा विषयी जागृती निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.


यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने 1992 मध्ये ब्राझील मधील रिओ डी जानेरो येथे पर्यावरण आणि विकास या विषयावर एक परिषद आयोजित केली होती आणि याच वर्षी 22 मार्च दिवस जागतिक जल म्हणून साजरा करण्यात येऊ लागला. त्याचबरोबर संयुक्त राष्ट्र संघाने 2030 पर्यंत सर्वांसाठी स्वच्छ पाणी पुरवण्याचे लक्ष श्वास्वत विकास उद्दिष्टांमार्फत ठेवले आहे. विशेषतः पाण्याचा प्रश्न भारतासारख्या कृषी प्रधान अर्थव्यवस्थेसाठी अतिशय महत्त्वाचा असणारा आहे. त्यासाठी आजपर्यंत आणि प्रयत्नही सरकारकडून करण्यात आलेले आहेत. तरीही अनेक पातळीवर आपण पाणी संवर्धनात अपयशी ठरला आहात.

केंद्र सरकारचा महत्वकांक्षी नमामि गंगे प्रकल्प योजनेअंतर्गत गंगा नदीचे पुनरुत्थान करण्याचा प्रयत्नही साप फसला आहे. वेद शहरातून वाहणाऱ्या नद्या प्रदूषित झाले आहेत.

विविध उद्योगधंद्याने ही नदी सोडलेली विषारी द्रव्य शहरात सांडपाणी याचे नियोजन करण्याची जितेंद्र गरज आहे. त्यासाठी विविध पर्यायी उपायांचा शोध घेणे अगत्याचे आहे. त्याचबरोबर नदीजोड प्रकल्प ही सरकार राबवत आहे.

या प्रकल्पांतर्गत जास्त पाणी असलेल्या नदी खोऱ्यातील पाणी कमी पाणी असलेल्या नदीखोऱ्याकडे वळवणे हा त्यामागचा उद्देश काळव्यांच्या साह्याने सतत देणारी पूर आणि पाण्याची कमतरता कमी करण्यासाठी भारतीय नद्यांना जोडून जलस्त्रोतांचे प्रभावीपणे व्यवस्थापन करणे हा त्यामागचा हेतू आहे. भारतातील पाणी समस्या सोडवण्यासाठी नदीजोड प्रकल्प ही एक महत्त्वकांक्षी योजना महत्त्व पर्याय उपाय ठरू शकते परंतु प्रदूषित झालेल्या नद्यांना स्वच्छ करणे ही सुद्धा अत्याधिक महत्त्वाची बाब असल्याचे विसरून चालणार नाही.

पाणी स्त्रोतांचे प्रदूषणापासून संरक्षण करण्यासाठी कठोर धोरणांचे अंमलबजावणी व्हायला हवी. त्याचबरोबर प्रत्येक समाजाने आपली जबाबदारी ओळखून प्रत्येक वेळी शक्य त्या ठिकाणी पाण्याचा उपयोग टाळण्याची गरज आहे ही जबाबदारी प्रत्येकाने पार पाडण्यासाठी आपापला वाटा उचलण्याची गरज आहे .



## मुरली आण्णांनी घेतली निलम ताईंची सदिच्छा भेट



पुणे दि.२२: पुण्यातून महायुतीकडून माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यापार्श्वभूमीवर मुरलीधर मोहोळ यांनी शिवसेना नेत्या तथा उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची त्यांच्या सिल्व्हर रॉक्स या निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन सत्कार स्विकारला . यावेळी डॉ. गोऱ्हे यांनी त्यांना महावस्त्र , पुष्पगुच्छ आणि श्री महालक्ष्मी देवीची प्रतिमा भेट देत निवडणुकीत भरघोस मतांनी विजयासाठी शुभेच्छा दिल्या.

यांप्रसंगी, ऊद्योजक रेखा चोरगे, माजी नगरसेविका सोनाली लांडगे, रंजना कुलकर्णी, पुणें शहर महिला सहसंपर्क प्रमुख सुदर्शना त्रिगुणाईत, शिवसेना ऊपशहर प्रमुख श्रुती नाझीरकर, श्रद्धा शिंदे, सुप्रिया पाटेकर, मंगल सोनटक्के, युवराज शिंगाडे, राजू विटकर, सुधीर जोशी शिवसेना कार्यालय सचिव , संतोष लांडगे, शिवसेना ऊपशहरप्रमुख संजय डोंगरे, धैर्यशील कदम, संकेत मोरे, संजय तुरेकर, आदी शिवसैनिक उपस्थित होते. याभेटीवेळी उपस्थित शिवसैनिकांनी सकारात्मक प्रतिसाद देत श्री. मोहोळ यांचा विजय मताधिक्यांचा विक्रम निश्चितपणे गाठेल अशी भावना व्यक्त केली.

# पुण्यात मोहोळ की धंगेकर?

लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाकडून आमदार रवींद्र धंगेकर यांची निवड करण्यात आली .त्यामुळे पुण्याच्या लोकसभा निवडणुकीत मोहोळ विरुद्ध धंगेकर असा सामना रंगणार आहे आहे .धंगेकर यांनी कसबा पोट निवडणुकीत भाजपाला धूळ चारली होती, त्यामुळे हा कसबा पॅटर्न या दुरंगी निवडणुकीत चालणार का यावर राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. पुणे लोकसभा निवडणुकीसाठी इच्छुकांच्या अर्जामध्ये आमदार धंगेकर यांचा अर्ज आला होता .काँग्रेसच्या बैठकीत धंगेकरांच्या नावावर जवळपास शिक्कामोर्तब झाला होता .अखेर त्यांच्या नावाची घोषणा गुरुवारी रात्री करण्यात आली .कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपाचे उमेदवार हेमंत रासने यांना पराभवाचा धक्का धंगेकर यांनी दिला या निवडणुकीत त्यांना दहा हजार पेक्षा जास्त मते पडली व ते विजयी झाले .दांडगा जन संपर्क, तात्काळ काम करण्याची वृत्ती यामुळे ते नगरसेवक म्हणून लोकप्रिय आहेत रवींद्र धंगेकर यांच्या कारकिर्दीची सुरुवात शिवसेनेतून झाली होती. त्यानंतर ते काही काळ



मनसेचे कार्यकर्ते झाले. या दोन्ही पक्षातून त्यांना चार वेळा त्यांनी चार वेळा निवडणूक लढवली.




काय ते ऊन, काय तो रस: एकदम ओक्के

## खमंग भज्या सोबत करा होळी साजरी

पुरणपोळीशिवाय होळीचा सण पूर्ण होऊ शकत नाही. म्हणूनच होळीच्या सणादिवशी 'होळी रे होळी पुरणाची पोळी'' असे पारंपरिक गाणे गातात. महाराष्ट्रात होळीच्या अग्नीला पुरणपोळीचा नैवेद्य दाखवतात. तसेच संपूर्ण समाज बांधव होळीची मनोभावे पूजा करतात. या सणाला भारतात वेगवेगळी नावे आहेत. होलिका दहन, शिमगा, हुताशनी महोत्सव, फाग, फागुन, दोलायात्रा, कामदहन अशा वेगवेगळ्या नावांनी होळी आपल्या देशात साजरी होते. या दिवशी भारतातील वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळे पदार्थ बनविले जातात. महाराष्ट्रात पुरणपोळी आणि कटाची आमटी राजस्थानात गुजरात थंडाई इत्यादी. आज एक आगळावेगळा होळीचा पदार्थ आणि तो कसा बनवायचा त्याची रेसिपी वाचूयात.

**भांगेच्या पानांची भजी** -

साहित्य - एक कप बेसन, दोन चिमूट मीठ, पाव चमचा हळद, अर्धा चमचा लाल मसाला, एक चमचा आमचूर पावडर, एक चमचा भांगेच्या पानांची पेस्ट, दोन चिरलेले कांदे आणि एका बटाट्याचे काप.

**कृती** - बेसन, मीठ, हळद,लाल मसाला, आमचुर पावडर, भांगेच्या पानांची पेस्ट यांचं मिश्रण एकजीव करून घ्या. पाणी टाकून भजी तळण्याइतपत मिश्रण सैलसर करा. या मिश्रणात कांदे आणि बटाट्याचे तुकडे टाका. कढईत तेल गरम करा आणि भजी त्यात सोडा आणि कुरकुरीत तळून घ्या. होळी खेळून झाल्यावर गरमागरम चविष्ट भजी खाण्यात वेगळाच आनंद मिळतो.

# नियमांचे उल्लंघन की मार्च अखेरचे लक्ष्य?

पुणे 22 मार्च - मार्च ऐंडिंग मुळे पूर्ण पुणे शहरात पोलिसांचा बंदोबस्त वाढला आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर पोलिसांकडून कारवाई केली जात आहे. गेली वर्षभर ज्या चौकांमध्ये, रस्त्यांवर कधीच पोलीस बंदोबस्त दिसला नाही, त्या रस्त्यांवर या महिन्यात कडक बंदोबस्त असल्याचे चित्र दिसत आहे.

या कडक उन्हाच्या वातावरणात वाहतूक करताना अचानक पोलिसांकडून अडवले जाण्याचे सत्र सध्या पुण्यात सुरू आहे. ड्रायव्हिंग लायसन्स, गाडीचे कागदपत्र, पीयूसी व अशाच कागदपत्रांची तपासणी पोलिसांकडून केली जात आहे. पुणे शहरातील लॉ कॉलेज रस्ता, फर्ग्युसन रस्ता, कर्वे रोड, जे.एम. रोड यांसारख्या प्रमुख रस्त्यांवर तसेच आगरकर रस्ता, नर्गिस दत्ता रस्ता, कोल्हटकर रस्ता अशा कमी वाहतुकीच्या रस्त्यांवर सुद्धा पोलिसांची उपस्थिती दिसून येत आहे.

वर्षभर या रस्त्यांवर पोलिसांची उपस्थिती दिसत नाही व याच महिन्यात त्यांची उपस्थिती असल्याने हे खरंच नियमांचे उल्लंघन आहे की मार्च ऐंडिंगचे टार्गेट..? असा प्रश्न पुण्यातील नागरिकांना पडला आहे.

## सोसायटीच्या तोंडावर 'स्वच्छ' ची कचराकुंडी

**पुणे, 22 मार्च:** सेनापती बापट रोडला लागून असलेल्या 'पुणे मनपा सेवक सहकारी गृहरचना संस्था मर्यादित' या सोसायटीच्या प्रवेशद्वारावरच 'स्वच्छ' संस्थेची कचराकुंडी गेली बरेच वर्ष ठाण मांडून बसविली आहे. सोसायटीतील पदाधिकाऱ्यांनी वारंवार सांगून सुद्धा ती कचराकुंडी तेथून हलवली हलवली गेली नाही. या कचराकुंडीमुळे तेथील नागरिकांना खूप त्रास होत असल्याचे तेथील रहिवाशांनी सांगितले.

या कचराकुंडी शेजारीच एक वडापावची गाडी असून या गाडीवर वडापाव घेण्यासाठी व तेथेच खाण्यासाठी रोजच लोकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. अशा खाद्यगाडी शेजारी ही कचराकुंडी असल्यामुळे वडापाव घ्यायला येणाऱ्या लोकांना खूप त्रास होत असल्याची माहिती सदर खाद्यगाडीचे मालक जाधव यांनी दिली.

## डॉ. आंबेडकरांनी समता व शोषणमुक्त समाजाचा पाया घातला- मोहन भागवत

पुणे, ता. २२ - धर्म व मूल्यांवर आधारित समता व शोषणमुक्त समाजाचा पाया भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या जीवनकार्यातून घालून दिला. देशाच्या एकात्मतेसोबत समता, स्वातंत्र्याची सांगड कशी घातली गेली पाहिजे. याचं मौलिक मार्गदर्शन संविधानाच्या माध्यमातून त्यांनी केलं. आणि अशा महामानवाचं सर्वार्थाने दर्शन घडवणारे हे सुंदर असे राष्ट्रीय स्मारक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले. सेनापती बापट रस्त्यावरील सिम्बायोसिस विद्यापीठ परिसरात असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणाभूमी या स्मारकाला भेट दिल्यानंतर छोटेखानी सत्कार समारंभ प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ डॉ. गो. बं. देगलूरकर, डॉ. शां.ब. मुजुमदार, संजीवनी मुजुमदार, डॉ. विद्या येरवडेकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पुणे महानगर



डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात डॉ. आंबेडकर प्रतिमेचे पूजन करताना सरसंघचालक डॉ. मोहन भागवत

संघचालक रवींद्र वंजारवाडकर, कार्यवाह सचिन भोसले, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते के. डी. जोशी, काश्यपदादा साळुंखे, किशोर खरात, वेणू साबळे, क्षितिज गायकवाड, संघर्ष गवाले, विजय कांबळे, शरद शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. सरसंघचालक मोहन भागवत यांनी आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाला भेट देवून डॉ. आंबेडकरांच्या जीवनात त्यांनी उपयोगात आणलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शनास भेट दिली. यावेळी स्मारकाच्या संचालिका संजीवनी मुजुमदार व विद्या येरवडेकर यांनी त्यांना स्मारका संबंधाने विस्ताराने माहिती दिली. या स्मारकांची वास्तू त्यातील ठेवा मुजुमदार कुटुंबियांनी खूप सुंदर रित्या जपला आणि मांडला आहे. यासाठी त्यांचे अभिनंदन करायला हवे. त्यांनी उभारलेले हे स्मारक डॉ. आंबेडकरांच्या असंख्य आठवणींना उजाळा देणारे आहे. प्रत्येक भारतीय नागरिकांनी या प्रेरणा भूमिचे दर्शन घेवून त्यातून प्रेरणा घ्यायला हवी असे सरसंघचालक भागवत म्हणाले. यावेळी बोलताना डॉ. मुजुमदार यांनी आपल्या मनोगतातून या स्मारकाच्या उभारणी संबंधातील आठवणी सांगितल्या. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ चारित्र्यवान नागरिक घडवते. आपल्या उच्च शिक्षण व्यवस्थेत विद्यार्थी शिक्षित होतात मात्र सुसंस्कृत होत नाहीत. सुसंस्कृत, चारित्र्यवान विद्यार्थी - नागरिक घडावा यासाठी संघाने उच्च शिक्षण क्षेत्रात काम करावे असे आवाहनही त्यांनी केले.

विशाल जगताप

# आयपीएल, पैसा आणि टेस्ट क्रिकेट...

आजपासून आयपीएलचा 17 वा हंगाम सुरू होत आहे. गेल्या वर्षीचे विजेते चेन्नई सुपर किंग्जचा सामना नुकत्याच नाव बदललेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळूरू सोबत होईल. त्यात कालच आपल्या लाडक्या धोनीने कर्णधारपद सोडून सर्वांनाच धक्का दिला आहे. तसे, धक्का देणे हे त्याच्यासाठी काही नवीन नाहीय. अख्खा भारत देश झोपलेला असताना कसोटीतून निवृत्ती असूद्या किव्वा 15 ऑगस्टच्या संध्याकाळी आंतरराष्ट्रीय क्रिकेट मधून निवृत्तीची घोषणा असूद्या, धोनी कधी काय करेल, काहीच सांगता येत नाही. तर दुसरीकडे, विराटही कित्येक दिवसांनी आपणास मैदानावर पाहायला मिळणार आहे. त्यामुळे धोनी विरुद्ध विराट यांच्यात सामना पहायला सर्वच उत्सुक असतील.

2008 पासून चालू झालेली ही स्पर्धा भारतीयांसाठी जणू काही सणच बनुन गेलेली आहे. प्रत्येक जण याची उत्सुकतेने वाट पाहत असतो. दिवसभर काहीही करा, रात्री मात्र आपल्या आवडत्या टीम ची मॅच नक्की बघायची. कधी काळी इंग्लंड आणि ऑ्ट्रेलिया या संघांनी राज्य केलेल्या या खेळावर आज बीसीसीआय अधिराज्य गाजवत आहे. याचे प्रमुख काय, तर आयपीएल. आयपीएलची सुरुवात झाली आणि क्रिकेटचा इतिहासच बदलून गेला. कधी काळी भारताच्या दौऱ्यावर येताना स्वतःचे शेफ आणणारी मंडळी आज नमस्ते, जय हिंद असे बोलत आपल्या देशात येतात. हे शक्य करून दाखवले ते आयपीएल नेच. वर्षभर खेळून जेवढे पैसे मिळतात, तेवढे पैसे फक्त दिढ महिने आयपीएल खेळून भेटायला लागले की हेच होणार. या वर्षी झालेल्या लिलावात ते कहरच झाला. ऑस्ट्रेलयाचा दिग्गज मिचेल स्टार्क याला एक नाही, दोन नाही तर तब्बल 24.75 कोटी रुपये खर्च करत कोलकाता नाईट रायडर्सने आपल्या संघात घेतले. तर, भारतीय संघाकडून खेळताना 'अ' श्रेणीच्या खेळाडूंना फक्त 7 कोटी




रुपये मिळतात. यावरून आपण, आयपीएल आणि त्यातून खेळाडूंना होणाऱ्या आर्थिक मदतीचा विचार करू शकता.

फक्त खेळाडूच नव्हे, तर बीसीसीआय लाही याचा तेवढाच फायदा होतो. आयपीएल २००८ साली सुरु करण्यात आले. त्यावेळी २००८ ते २०१७ या १० वर्षांसाठी सोनी या कंपनीने प्रसारणाचे हक्क घेतले होत आणि त्यासाठी त्यांनी ८२०० कोटी रुपयांचा करार केला होता. त्यानुसार प्रत्येक सामन्यासाठी बीसीसीआयला १३.६ कोटी रुपये मिळत होते. त्यानंतर स्टार नेटवर्कने पाच वर्षांसाठी प्रसारणाचे हक्क घेतले होते आणि त्यासाठी त्यांनी १६, ३४७.५० कोटी रुपये मोजले होता. स्टारचा हा करार २०१७ ते २०२२ या वर्षांपर्यंत होता. २०२२ मध्ये तर गोष्टी आणखीच मजेशीर झाल्या. यावेळी पुढच्या पाच वर्षांसाठी आयपीएल च्या प्रसारण अधिकारासंदर्भात मोठी डील झाली. टीवी राइट्सचे अधिकार 'डिज्नी स्टार' ने मिळवले, तर डिजिटल राइट्स वायकॉम १८ ने मिळवले. 44075 कोटी रुपयांमध्ये 2023 ते 2027 साठी आयपीएल च्या टीवी आणि डिजिटल राइट्सची डील झाली. आता हे आकडे जेवढे थक्क करणारे आहेत, तेवढेच खरे ही. पण म्हणतात ना, फक्त पैसा तुम्हाला सार सुख नाही देऊ शकत. जर तसं असतं तर, प्रत्येक वर्ल्ड कप भारतच जिंकला असता. झालंय मात्र याच्या उलटच. 2013 नंतर एकही आयसीसी ट्रॉफी जिंकण्यात भारताला यश आलेले नाही. आयपीएल आणि त्यामागोमाग इतर टी 20 लीग्स यायला चालू झाल्या आणि अंतरराष्ट्रीय क्रिकेटचे चित्र हळू हळू बदलायला लागले. खेळाडू या लीग्ज ला ज्यादा प्राधान्य देऊ लागले. तसं, त्यांचही काहीं चुकत नाहीत म्हणा. शेवटी तेही आपल्या पोटाचाच विचार करणार. पण काही खेळाडू स्वार्थापायी फक्त टी20 लिग्जना प्राधान्य देताना दिसत आहेत.

या पैश्याचा खेळात जर कुठल्या गोष्टीचे सर्वात जास्त नुकसान झाले असेल, तर ते म्हणजे टेस्ट क्रिकेट. क्रिकेटच्या या सर्वात जुन्या स्वरूपाला आपले अस्तित्व टिकविण्याची वेळ आज आली आहे. पाच दिवस चालणाऱ्या टेस्ट क्रिकेटला आजही तितकीच पसंती पहावयास मिळते. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि भारत हे तीन देश टेस्ट क्रिकेटला आजही सर्वोच्च स्थान देऊन जिवंत राखण्याचा प्रयत्न करतात. पण, प्रत्येक क्रिकेट बोर्ड हे करूच शकेल असे नाही. टी 20 क्रिकेट आणि लीग मध्ये जलद पैसा आहे. आणि त्यांना जर स्वतःला टिकवायचं असेल तर पैसा हवाच. पण मग हे करताना टेस्ट क्रिकेट कुठे तरी मागे पडतं. गेल्याच महिन्यात दक्षिण आफ्रिका संघाने न्यूझीलंड दौऱ्यावर आपला दुय्यम संघ टेस्ट सिरीज खेळायला पाठवला होता. कारण? त्या सिरीज दरम्यान होणार असणारी दक्षिण आफ्रिका टी-20 लीग. या लीग साठी आपले सर्वोत्तम खेळाडू उपलब्ध असावेत म्हणून त्यांनी आपल्या देशाचा दुबळा संघ न्यूझीलंड ला पाठवला. हा निर्णय तसं पूर्णतः क्रिकेट बोर्डचा असतोच असे नाही. यात त्या लीग चे प्रायोजक, ब्रॉडकास्टर्स, टीम मालक यांचाही समावेश होतो. या सगळ्या दबावात खेळाडूंना इलाज नाईलाजाने या लीगस नाच प्राधान्य द्यावे लागते. नुकतीच इंग्लंड आणि भारत यांच्यात रोमांचक टेस्ट सिरीज पार पडली. भारताने यात 4-1 असा विजय मिळवला. युवा खेळाडू सरफराज खान, ध्रुव जुरेल, पड्डिकल यांनी टेस्ट क्रिकेट खेळण्याची जी जिद्द आणि चिकाटी दाखवली ते पाहून सर्व चाहते खुश झाले होते. कर्णधार रोहित शर्मानेही जे खेळाडू टेस्ट क्रिकेट खेळण्यास उत्सुक आहेत त्यांनाच ईथे स्थान आहे असे बोलून जणू काही धमकीच दिली. रणजी क्रिकेट आणि त्याच्या महत्वाबद्दलही तो भरभरून बोलला. आश्विन नेही आपल्या 100व्या टेस्ट दरम्यान टेस्ट क्रिकेटचे महत्व सांगितले. "कसोटी क्रिकेट हे माणसाचा जीवन प्रवासच दर्शविते. ते तुम्हाला जीवनाशी साधर्म्य दाखविते. ताणतणावांना सामोरे जाण्यास शिकविते", असे तो म्हणाला. नवीन पिढीनेही आश्विन, जडेजा, अँडरसन सारख्या दिग्गज खेळाडूंकडून प्रेरणा घेऊन टेस्ट क्रिकेटला प्राधान्य द्यायला हवे. त्याचे अस्तित्व टिकवण्यासाठी मदत करायला हवी. खऱ्या क्रिकेट प्रेमीची हा सर्वात जुना आणि पवित्र फॉरमॅट कायम जिवंत रहावा हीच अपेक्षा असेल.

# परीक्षेतील गैरव्यवहार आणि केंद्र सरकारचे विधेयक



केंद्र सरकारने परीक्षेतील गैरव्यवहार- म्हणजे बहुतांश प्रकरणांत कॉपी- रोखण्यासाठी नवे नमुना विधेयक सादर केले आहे. शिक्षण आणि परीक्षा हे राज्यांच्याही अखत्यारीतील विषय. तेव्हा केंद्राने सादर केलेल्या विधेयकाच्या आधारे राज्याराज्यांनी आपापले स्वतंत्र कायदे करणे अपेक्षित आहे. केंद्रीय कायद्यात अशा गैरव्यवहारांसाठी तीन ते १० वर्षेपर्यंत तुरुंगवास आणि/किंवा कोटभर रुपयांपर्यंत दंड अशी शिक्षा सुचवण्यात आलेली आहे. कोणत्याही विषयावरचा कायदा त्या विषयाशी संबंधित गैरव्यवहारांस शासन करण्यासाठी असतो. ते योग्यच. हा शासन व्यवहाराचा भाग झाला. तथापि अनेक मुद्दे हे कायदा आणि शासन यांच्या पलीकडचे असतात आणि ते केवळ सरकारला वाटते म्हणून यम-नियमांनी सोडवता येत नाहीत. त्यासाठी प्रबोधन आणि नागरिकांच्या जगण्याच्या सवयींत प्रयत्नपूर्वक बदल करावा लागतो.

हे वेळखाऊ काम. शिवाय ज्याने सुरू केले त्यास त्याच्या हयातीत त्या कामाचे श्रेय मिळेल याची हमी नाही. तेव्हा अशा प्रकारच्या कामांपेक्षा झटपट निकाल आणि श्रेयनामावलीतील समावेशाची हमी देणारे निर्णय घेण्याकडे सरकारचा कल असतो. मग ते सरकार कोणत्याही पक्षाचे असो. हे सत्य या नव्या कायद्यासही लागू होते. कसे ते समजून घेण्यासाठी 'द इंडियन एक्स्प्रेस'ने विशेष वृत्ताद्वारे प्रसिद्ध केलेले स्पर्धा परीक्षांचे वास्तव उपयोगी पडेल. या स्पर्धा परीक्षा आणि शालेय-महाविद्यालयीन परीक्षा यांत अर्थातच फरक आहे. स्पर्धा परीक्षा विविध शासकीय भरत्यांसाठी होत असतात. म्हणजे यातील 'यशस्वी' हे पुढे सरकारांत विविध पदी नेमले जातात. त्याचमुळे या परीक्षांचे वास्तव किती भयाण आहे हे जाणवून सरकारी सेवांच्या दर्जाविषयी प्रश्न निर्माण होतो. 'एक्स्प्रेस'च्या वृत्तानुसार १५ राज्यांतील नेमणुकांच्या ४१ परीक्षांत गैरव्यवहार झाला आणि त्याचा थेट फटका देशभरातील सुमारे दीड कोट विद्यार्थ्यांना बसला. यात सर्व पक्षीय राज्य सरकारांचा समावेश आहे. यात प्रमुख घटना आहे ती पेपर फुटणे ही. महाराष्ट्रात तलाठी आदी परीक्षांतील पेपरफूट ज्याप्रमाणे सध्या गाजत आहे त्याप्रमाणे अन्य राज्यांतही असे विविध परीक्षांचे पेपर फुटले. यात कायद्याचे राज्य संकल्पना राबवण्याची जबाबदारी ज्यांच्याकडे असते त्या पोलीस भरतीच्या प्रश्नपत्रिकाही फुटल्याचा प्रकार आसाम राज्यात घडला. या विविध परीक्षांतून जवळपास एक लाख चार हजार पदे भरली जाणार होती. पण त्यासाठी अर्जदार होते एक कोटी पाच लाख. म्हणजे प्रत्येक पदासाठी किमान १०० -१०० दावेदार अशी स्थिती. यातून दोन मुद्दे ठसठशीतपणे समोर येतात. पहिला अर्थातच सरकारबाह्य रोजगार संधींच्या टंचाईचा. आणि दुसरा अशी टंचाई असतानाही सरकारी यंत्रणा ही परीक्षा घेताना दाखवत असलेली हेळसांड. 'एक्स्प्रेस'चे वृत्त राज्ये आणि त्यांच्या परीक्षांतील गैरव्यवहार तसेच उपलब्ध रोजगार संधी आणि त्या तुलनेत विद्यार्थी अर्जदार यांचा तपशील देते. तो भयावह आहे. उदाहरणार्थ गुजरातसारख्या आर्थिकदृष्ट्या प्रगत, भरभराट वगैरे सुरू असलेल्या राज्यात तीन परीक्षांत गैरव्यवहार झाले. या तीन परीक्षांतून ५,२६० इतकी पदे भरली जाणार होती. पण या पदांसाठी तब्बल १६ लाख ४१ हजार इतके उमेदवार इच्छुक होते. यावरून त्या राज्यातील प्रगती आणि रोजगार संधी यांचा अंदाज यावा. उत्तर प्रदेशात अवघ्या ३,३०० पदांसाठी १९ लाखांहून अधिक उमेदवार तर उत्तराखंडातील १,८०० पदांसाठी दोन लाख ३७ हजार जण परीक्षेच्या रिंगणात होते.

राजस्थानातील ४० हजार पदांसाठी ३८ लाखांहून अधिक प्रयत्न करीत होते तर महाराष्ट्रातील ६,५६० पदांसाठी ११ लाख २५ हजारांत चुरस होती. जम्मू-काश्मिरात स्थानिक सरकार नाही त्यास काळ लोटला. पण त्या राज्यांतील सेवा परीक्षांतही भ्रष्टाचार झाल्याचे दिसते. त्या राज्यात फक्त २,३३० सरकारी पदे भरण्यासाठी तीन विविध परीक्षा झाल्या आणि त्यांना दोन लाख ४९ हजार विद्यार्थी सामोरे गेले. यावरून ही परीक्षा गैरव्यवहाराची बाधा सर्वपक्षीय आहे हे लक्षात येईल. हा सर्व तपशील ज्या परीक्षांतील गैरव्यवहार उघडकीस आले त्याबाबतचा आहे. गैरव्यवहारांस वाच्यताच फुटली नाही आणि सर्व काही सुरळीत पार पडले, असे प्रकार वेगळेच. ते लक्षात घेतल्यास समस्येचा आकार लक्षात यावा. अलीकडे तर कनिष्ठ पदांसाठीही चांगले चांगले दुहेरी पदवीधर, त्याहूनही उच्चशिक्षित अर्ज करताना दिसतात. हीच बाब अभियंत्यांबाबतही. अभियांत्रिकीची वर्तमानातील पदवी पूर्वीइतक्या वेतनमानाची हमी देत नाही. परिणामी अभियांत्रिकीच्या स्पर्धेत उतरून, अभ्यासाचे ताण-तणाव सहन करून अभियंता होणारे तरुण-तरुणी किती तरी पायऱ्यांनी कनिष्ठ पदांसाठी जीव तोडून प्रयत्न करतात. हे सारे बेरोजगारीच्या आव्हानाचे गांभीर्य अधोरेखित करणारे आहे. यंदा तर हे आव्हान अधिकच वाढेल अशी चिन्हे आताच दिसू लागली आहेत. इतकी वर्षे विद्यापीठांच्या, महाविद्यालयांच्या आवारांतूनच थेट नेमणुकांसाठी ओळखल्या जाणाऱ्या शैक्षणिक संस्था रोजगारदात्यांच्या प्रतीक्षेत आहेत. काही विख्यात संस्थांनी आपल्या माजी विद्यार्थ्यांस 'जरा आजी विद्यार्थ्यांच्या रोजगारांचे बघा', असे आवाहन केले आहे. घाऊक भरतीसाठी ओळखल्या जाणाऱ्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या टीसीएस, इन्फोसिस, विप्रो आदींनी यंदा आपण हात आखडता घेणार आहोत हे आधीच जाहीर केले आहे आणि विप्रोसारख्या कंपनीने तर मधल्या फळीतील अनेकांस कामावरून काढून टाकले जाणार असल्याचे सूचित केले आहे. म्हणजे एका बाजूने खासगी क्षेत्रातील संधींचे आकुंचन आणि दुसरीकडे सरकारी सेवेतील भरतीसाठी होणाऱ्या परीक्षांतील गैरव्यवहारांचे वाढते प्रसारण अशा दुहेरी कात्रीत आजचा सुशिक्षित बेरोजगार पिळवटून निघत आहे. पण त्याची फिकीर काही कोणास आहे असे दिसत नाही. सर्वत्र सर्व काही आलबेल, उत्तम असल्याचे भुईनळे लावले जावेत आणि त्याची द्वाही फिरवणारे आपटबार वाजवले जावेत असाच व्यवस्थेचा आग्रह. त्यामुळे सरकारी सेवेतील परीक्षांत गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस येऊनही थेट काही कारवाई होते असे दिसत नाही आणि फेरपरीक्षाही लगेच घेतल्या जात नाहीत. म्हणजे सगळे काही भगवान भरोसेच! आधी परीक्षांच्या तारखांचा घोळ, झाल्या तर कोणा एखाद्या केंद्रावर पेपर फुटणार वा काही तरी गैरव्यवहार होणार, मग त्याच्या चौकशीची मागणी, संबंधितांचे आंदोलन, फेरपरीक्षेची मागणी आणि मग ती मागणी करणारे आणि परीक्षा उत्तीर्ण झालेले यांच्या दोन तटांतील संघर्ष इत्यादी प्रकार! आणि यातील काहीही न होता परीक्षा धड पार पडल्या, निकाल सकारात्मक लागला तरी लगेच भरतीची प्रक्रिया सुरू होईल याचीही आशा नाही. महाराष्ट्रात अशा भरतीच्या प्रतीक्षेत असलेल्यांची संख्या हजारांत तरी असावी. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यांत ही स्थिती. त्यावरून उत्तर प्रदेश, बिहारादी राज्यांत काय काय आणि कसे होत असावे याचा अंदाजही घाम फोडणारा असेल. अशा वेळी परीक्षांतील गैरव्यवहार रोखणारा कायदा आणणे हे काही तरी केल्याचे समाधान मिळवण्याइतकेच उपयुक्त. अशा समाधानाचा प्रयत्न योग्यच. पण तो समस्या सोडवण्यास पुरेसा नाही.

खरी समस्या आहे ती लहानसहान सरकारी नोकऱ्यांसाठी इतक्या प्रचंड प्रमाणात विद्यार्थ्यांस सामोरे जावेच का लागते; ही. अशा सरकारी सेवांची मागणी कशी, किती कमी करता येईल यावरही विचार हवा. परीक्षांतील गैरव्यवहार रोखले जाणे गरजेचेच. पण बाजारपेठेसाठी टाकाऊ, परीक्षा-केंद्रित शिक्षण व्यवस्थेचे काय करायचे हा खरा गंभीर प्रश्न! बाकी सर्व चर्चा हे मनोरंजन!

ऋतुजा घनवट

# रशिया-युक्रेनचे भारताला निमंत्रण

गेल्या दोन वर्षापासून रशिया आणि युक्रेन या दोन देशांमध्ये युद्ध चालू आहे. हे युद्ध थांबवण्यासाठी जगभरातील विविध देश प्रयत्न करत आहेत परंतु काही ना काही नवीन वादातून हे युद्ध वाढतच चालले आहे. आता नुकत्याच रशियामध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये पुन्हा एकदा व्लादिमिर पुतीन निवडून आले आहेत या निवडणुकीचे निकाल काही देशांनी मान्य केले आहेत तर काही देशांनी अमान्य केले आहेत या मध्ये फ्रान्स जर्मनी यूएसनी हा निकाल मान्य नाही अशी जाहीर प्रतिक्रिया दिली आहे. तर भारताने पुतीन यांना पुन्हा एकदा रशियाचे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आल्याने शुभेच्छा दिल्या आहेत. भारताची ही प्रतिक्रिया खूप महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

नुकताच रशिया आणि युक्रेननी निवडणूक झाल्यानंतर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आपल्या देशात येण्याचे निमंत्रण दिलं आहे. रशिया-युक्रेन युद्ध थांबवण्यासाठी भारताचे प्रयत्न महत्त्वपूर्ण मानले जाणार आहेत. भारताचे रशिया आणि युक्रेन सोबतचे संबंध सलोख्याचे आहेत. युक्रेंचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर ज़ेलेंस्की यांची इच्छा आहे की, भारताने स्विझरलँड येथे होणाऱ्या जागतिक शांतता परिषद मध्ये युक्रेनच्या बाजूने बोलावं.

या शांतता परिषदचे उद्दिष्ट रशिया युक्रेन यांच्यामध्ये चालू असलेल्या युद्धजन्य परिस्थिती थांबवण्याचे आहे. यामुळे या परिषदेत कडे सर्वांचे लक्ष लागून आहे यामध्ये भारत काय भूमिका घेणार? याकडे दोन्ही देशाचे तसेच या परिषदेमध्ये असणाऱ्या इतर 193 सदस्य देशाचे लक्ष आहे. या परिस्थितीला युक्रेन आणि रशिया हे दोन्ही देश येतील का हा सुद्धा एक महत्त्वपूर्ण प्रश्न आहे. रशिया आणि युक्रेन यांनी दिलेले निमंत्रण भारत स्वीकारेल का आणि या दोन्ही देशात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी जातील का याकडे सुद्धा सर्वांचे लक्ष आहे.

रशिया आणि युक्रेन यांच्यामध्ये चालू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीवर नरेंद्र मोदी काय भूमिका घेतील हे सुद्धा महत्त्वपूर्ण मानले जाणार आहे.

मोदींनी हे निमंत्रण स्वीकारले तरी भारताचे दोन्ही देशासोबत असलेले संबंध टिकून ठेवण्याचा प्रयत्न करणं आवश्यक आहे.

अमोल जाधव

# फुटबॉल : भारत विरुद्ध अफगाण सामना अनिर्णीत



सौजन्य स्पोर्ट किडा

**कोलकाता:** शुक्रवारी सौदी अरेबिया मधील डमक स्टेडियम वर भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात सामना पार पडला. फिफा विश्वचषक २०२६ साथीचे पात्रता फेरी सध्या सुरू आहे.

भारत विरुद्ध अफगाणिस्तान यांच्यात झालेल्या सामना अनिर्णीत सुटला. कोणत्याही संघास गोल करण्यात यश आले नाही. हा निकाल भारतीय संघासाठी मात्र निराशाजनक ठरला आहे. आता भारतीय संघ आपल्या गटात दुसऱ्या स्थानावर पोहचला आहे. गटात एकूण चार संघ आहेत. दुसरीकडे, कतारने कुवैत वर 3-0 ने मात करत आपले पाहिले स्थान कायम ठेवले आहे. भारतीय संघाला मात्र यावर्षी एकही विजय मिळवता आला नाही. आता पुढील सामन्यांमध्ये चांगली कामगिरी करण्याचा त्यांच्यावर दबाव असेल. हा सामना अफगाणिस्तान विरुद्धच कोलकाता येथे पार पडेल. भारतीय संघाच्या कामगिरीवर चाहत्यांनीही सोशल मीडियावर निराशा व्यक्त केली आहे. तब्बल 532 मिनिटांपासून मिनिटांपासून भारतीय संघाला एकही गोल करता आला नाही. कामगिरी नक्कीच चांगली नाही. यासह भारताचे कोच इगोर स्टीमॅच यांना जबाबदारी घ्यावी लागेल.

# निवडणुकीच्या रणधुमाळीत आयपीएलही सुरू

आजपासून आयपीएलचा 17 वा हंगाम चालू होता आहे. गेल्या वर्षीचे विजेते चेन्नई सुपर किंग्ज विरूद्ध रॉयल चॅलंजर्स बंगळूरू असा पहिला सामना होईल. सामना चेन्नईच्या एम ए चिदंबरम स्टेडियम वर होणार आहे. हा सामना सुरू होण्याआधीच एक मोठा धक्का चेन्नई संघाला बसला आहे. एम एस धोनीने आपण कर्णधार पद सोडणार असल्याचे जाहीर केले. त्याची जागा आता पुण्याचा ऋतुराज गायकवाड याने घेतली आहे. चेन्नईचा संघ दरवर्षी प्रमाणेच तगडा दिसत असून, मागच्या वर्षीचा कारनामा पुन्हा करण्याचा त्यांचा मनसुबा असेल. त्यात न्यूझीलंडचे डॅरेल मिचेल आणि रचिन रवींद्र यांचा समावेश झाल्याने संघ अजून च मजबूत झालेला आहे. दुसरीकडे बंगळूरू संघाबद्दल बोलायचे झाल्यास



दरवेळी प्रमाणे यावर्षीही त्यांची मदत मजबूत फलंदाजीवरच असणार आहे. मॅक्सवेल, फाफ ड्यू प्लेसिस, विराट कोहली यांच्या कामगिरीवरच संघाचे भवितव्य ठरेल असे चित्र दिसून येत आहे. या सामन्यातून विराट कोहली आपले पुनरागमन करणार असून, त्याकडेही सर्वांचे लक्ष राहील.

दरम्यान, आयपीएलच्या पहिल्या सामन्याआधी उद्घाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. आयपीएलच्या उद्घाटन सोहळ्यात बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफ परफॉर्म करणार आहेत. यासोबत एआर रहमान आणि सोनू निगम हे आपल्या आवाजाने चाहत्यांना मंत्रमुग्ध करणार आहेत. सीएसके-आरसीबी हेड टू हेड- आयपीएलमध्ये चेन्नई आणि बंगळुरू आतापर्यंत ३१ वेळा आमनेसामने आले. यापैकी २० सामन्यात चेन्नईचा संघाने बाजी मारली. तर, आरसीबीला केवळ १० सामन्यात विजय मिळवता आला आहे. याशिवाय, एक सामना अनिर्णित ठरला. दरम्यान, २००९ मध्ये चेन्नईने बंगळुरूचा ९२ धावांनी पराभव केला होता, जो दोन्ही संघांमधील आतापर्यंतचा सर्वात मोठा विजय आहे.

# १७ वर्षीय टोमोका मियाझाकीकडून पी व्ही सिंधूचा पराभव



बेसल मध्ये सुरु असलेल्या स्विस ओपन बॅडमिंटन स्पर्धेत पी व्ही सिंधूचा राऊंड ऑफ 16 मध्ये पराभव झाला आहे. तिचा सामना जपानच्या १७ वर्षीय टोमोका मियाझाकी झाला. तोमोकाने पहिला सेट हरल्यानंतर जबरदस्त पुनरागमन करत सामना १६ -२१ , २१ -१९ , २१ -१६ ने आपल्या नावे केला. हा सामना तब्बल ७९ मिनिटे रंगला. सिंधू सध्या आपले पुनरागमन करत आहे. गुडघ्याच्या दुखापतीमुळे सिंधू मागील ऑक्टोबर पासून खेळापासून दूर होती. परंतु, आता मात्र ती पूर्ण तंदुरुस्त आहे. स्विस ओपन बॅडमिंटन स्पर्धेत तिची कामगिरी कायमच चांगली राहिली होती. या स्पर्धेत तिने आत्तापर्यंत 3 वेळा फायनल गाठलेली आहे. त्यात २०१९ आणि २०२२ मधील विजेतेपदाचा समावेश आहे. तर २०२१ ला तिला पराभवाचा सामना करावा लागला होता. पहिला सेट हरल्यानंतर टोमोकाने सिंधूच्या अटॅकिंग खेळाशी जुळवून घेऊन आपल्या खेळत बदल केले. यानंतर मात्र आपल्या ट्रेडमार्क जपानी स्टाईल ने रॅलींचा वर्षाव केला. १७ वर्षीय टोमोका मियाझाकीने यावर्षी आपल्या खेळाने सर्वांनाच प्रभावित केलेलं आहे.

## मनोरंजन..

# झोमॅटोचे सीईओ अडकले लग्नबंधनात



झोमॅटोचे सीईओ दीपंदर गोयल आणि मेक्सिकन उद्योजग आणि मॉडेल ग्रेसिया मुनोज यांनी नुकतेच लग्न केले असल्याचे समोर आले आहे.ग्रेसिया मुनोज युनायटेड स्टेट्समधील मेट्रोपॉलिटन फॅशन विकची विजेती आहे. दीपंदर गोयल हेभारतातील सर्वात श्रीमंत व्यक्तींपैकी एक आहे.


जोडप्याच्या जवळच्या व्यक्तीने नाव न सांगण्याच्या अटीवर मनी कंट्रोलला दिलेल्या माहितीनुसार, गोयल व मुनोज यांचे लग्न एका महिन्यापूर्वी झाले होते आणि ते दोघे फेब्रुवारीमध्ये त्यांच्या हनीमूनवरून परतले होते. मेक्सिकोमध्ये जन्मलेल्या मुनोझने यापूर्वी मॉडेलिंग केले आहे आणि आता ती लक्झरी उत्पादनांच्या स्वतःच्या स्टार्टअपवर काम करत आहे. त्यावेळी मुनोज हिने तिच्या इंस्टाग्राम बायोमध्ये बदल करून 'माझा जन्म मेक्सिकोमध्ये झाला आहे आणि मी आता भारतात, माझ्या घरी आहे."अशा आशयाची ओळ जोडली आहे.

दिपेंद्र गोयल सध्या झोमॅटोच्या नव्या निर्णयावरून चर्चेत आले होते. दिपेंद्र गोयल सध्या झोमॅटोच्या नव्या निर्णयावरून चर्चेत आले होते. दिपेंद्र गोयल सध्या झोमॅटोच्या नव्या निर्णयावरून चर्चेत आले होते. झोमॅटोचे सीईओ दीपंदर गोयल यांनी आज १९ मार्च रोजी 'प्युअर व्हेज फ्लीट'सह 'शाकाहारी खाणाऱ्या ग्राहकांसाठी 'प्युअर व्हेज मोड' लॉंच केले होते. वेज ऑर्डर साठी हिरव्या रंगाचे कपडे परिधान करण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता.

# योद्धा : एकाच साच्यात बांधलेला सिनेमा

मागील आठवड्यात सिद्धार्थ मल्होत्राचा "योद्धा" सिनेमा चित्रपटगृहात प्रसिद्ध झाला. करण जोहर निर्मित "योद्धा" ह्या चित्रपटाने जी चर्चा निर्माण केली होती ती पाहता पहिल्या वीकेंडमध्येच हा चित्रपट अजय देवगणच्या शैतान या चित्रपटाला मागे टाकेल असा अंदाज बांधला जात होता परंतु योद्धा शैतानशी बरोबरही होऊ शकत नाही असे चित्र समोर आले आहे. त्यामुळे या चित्रपटाबद्दल बांधलेला अंदाज पूर्णपणे फोल्ड ठरला. योद्धा एक टास्क फोर्स युनिट आहे ज्या तीनही सैन्यदलांचं काम केलं जातं या युनिटचा प्रमुख चित्रपटाचा अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा म्हणजेच अरुण कटियाल आहे. अरुणच्या वडिलांनी या टास्क फोर्स युनिटला उभारलेले असते. अरुण सुद्धा वडिलांचा आदर्श घेऊन मोठा होतो आणि वडिलांसारखाच तोही योद्धा होतो.

सैन्यात कुठल्याही प्रकारची युद्ध परिस्थिती निर्माण झाल्यास सैन्यातील अधिकाऱ्यांनी वरिष्ठांचा आदेश येईपर्यंत वाट पाहायची असते मात्र योद्धाला या नियमाला अपवाद आहे, ही पद्धत योद्धा पाळत नाही ही, योद्धाची स्टाईल नाही असे म्हणत अरुण स्वतः काही निर्णय घेतो. पण त्याच्या या चुकीमुळे एक




वाईट घटना घडते आणि योद्धा टास्क फोर्स युनिटला बंद करण्याचा निर्णय सरकार घेत. सरकारने दिलेला हा निर्णय मागे घेण्यासाठी सगळे प्रयत्न निष्फळ ठरल्यावर अरुणची पत्नी प्रिया म्हणजेच अभिनेत्री राशी खन्ना त्याच्या जीवनातील घडामोडींवर कशा पद्धतीने व्यक्त होते त्यांच्या नात्याचे पुढे काय होते हा प्रवास या चित्रपटात दाखवण्यात आला आहे. हा चित्रपट मध्यंतरानंतर पुढे जातो तसे अरुण ज्या विमानाने प्रवास करतो ते हायजॅक केले जाते. दिशा पाटणीने यात विमानातील एअर होस्टेसचा अभिनय साकारला आहे. या हायजॅकसाठी अरुण जबाबदार आहे असे सर्वांना वाटते. अरुण खरंच विमान हायजॅक करतो का? की अजून काही होते? दिशा पाटणीची यामध्ये नक्की भूमिका काय आहे? हे सारे गुढ सिनेमाच्या शेवटी उलगडते. या चित्रपटाचे दिग्दर्शन हीच या चित्रपटाची ताकद आहे सिनेमातील दृश्ये, ॲक्शन सिक्वेन्स इत्यादी जे सीन्स चित्रित केले आहेत ते लाजवाब आहेत. सागर आंब्रे आणि पुष्कर ओझा या नवोदित दिग्दर्शकांनी हा सिनेमा दिग्दर्शित केला आहे. दोघांनी या आधी "पठाण", "वॉर" या सिनेमांसाठी सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केले आहे. मुख्य अभिनेता सिद्धार्थ मल्होत्राने या भूमिकेला योग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे मात्र काही ठिकाणी तो कमी पडला. राशी खन्नाला अपेक्षित डायलॉग्स मिळालेले नाहीत. दिशा पाटणीचा या चित्रपटातील अभिनय मात्र एक सरप्राईज आहे. मध्यंतराच्या आधीचा भाग अतिशय संथ दाखवण्यात आला आहे. परंतु मध्यंतरानंतरचा भाग पटापट घडत असल्याने फील येतो. चित्रपटाचे कथानक एकंदरीत अंदाज लावता येण्यासारखे असल्याने हा चित्रपट पाहण्याचा अनुभव कंटाळवाणा होतो.

# शाहरुख पुन्हा 'बाजीगर'

शाहरुख खान, काजोल आणि शिल्पा शेट्टी स्टारर कल्ट क्लासिक फिल्म बाजीगर सिनेमागृहात पुन्हा रिलीज होण्यासाठी सज्ज आहे. रोमँटिक रिव्हेंज थ्रिलरचे दिग्दर्शन अब्बास-मस्तान यांनी केले होते. काजोलने बाजीगरची ३० वर्षे साजरी केली, शाहरुख खानला पहिल्यांदा भेटली: 'मी चित्रपट सुरू केला तेव्हा १७ वर्षांची होती' "ज्या काळाची जादू रुपेरी पडद्यावर उलगडली त्या काळाचा फ्लॅशबॅक! आमच्या रेट्रो फिल्म फेस्टिव्हलमध्ये आयकॉनिक बॉलीवूड क्लासिक - बाजीगरसह ते क्षण पुन्हा जिवंत करण्यासाठी तुम्हाला आमंत्रित करत आहे.

ही जादू जिवंत करण्याचा बहुमान मिळालेला माणूस म्हणून, मी खूप आनंदी आहे. या नॉस्टॅल्जिक प्रवासात तुम्ही सामील व्हा. चला बॉलीवूडचा कालातीत युग एकत्र साजरे करूया," शाहरुखने त्याच्या इंस्टाग्राम पोस्टवर घोषणा केली.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्र विद्या विभागाचे प्रायोगिक प्रकाशन
संपादक - विशाल जगताप, उपसंपादक - अपुर्वा पतंगे, अमोल जाधव. मुख्य वार्ताहार - सिद्धांत साळुंके, आकाश सोनावणे, गणेश चंद्रवंशी, ऋतुजा घनवट
मार्गदर्शक :- डॉ. सजंय तांबट